# गांडू बगीचा नामदेव ढसाळ



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५५०

REFBK-0025267

वांडुबगीचा

# कविता

ग्रंथालय ठाणे



गांडू बगीचा
नामदेव ढसाळ
आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई

हातभार : मित्रवर्य सुशीलकुमार शिन्दे

# गांडू बगीचा

## नामदेव ढसाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बेंजामिन मोलाईज साठी




## सारीपाट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संग्रह शाखा

इंद्रिये मालवली जातात
प्रतिबिंबाला नक्षत्रे फुटतात
येरझरांची शतपावली
एकरूपतेचा श्रांत पक्षी
चिरनिद्रेचे घर स्थलकालाचा आरंभ
भूत भविष्य वर्तमानाची जमीन
निद्रेतून जागृतीत : जागृतीतून निद्रेत
जीवनानंदाची तरलता
कैवल्यानंदाचा सारीपाट
या अरण्यातून मला बाहेर पडू दे
निराकार रतीचे सुख
मी : तू चे खुले प्राकृत
वेदनाशून्य निरतिशयाचा पाणलोट
म्हणावे तर काय म्हणावे
या महारोगाला ?
प्रतिक्षिप्त क्रियांचे बाशिंग
त्यात झोपमोड झालेले अकरा रुद्र
यानंतरही आरसा किती स्वच्छ ठेवणार ?
माणसाने मोजू नये आपल्याच
आत्म्याची उंची

## लामणदिवा

त्वचेच्या पंखावरला लावण्याचा वास
भिनून जातो मस्तकात
घडी दोन घडीसाठी
ती होऊन बसते दर्शनी
या बाहय आवरणांपेक्षा
तिच्या आत्म्यातच दडून बसलाय सौंदर्याचा लामणदिवा
चंचल मोहक वाऱ्यावर
डोलणाऱ्या स्कर्टससारख्या तिच्या पेशी
श्वासहीन होऊन जातात काळ आणि रात्र आणि दिवस
विश्वासातून उगवतं जस्सं कमळ
तशा उगवतात मेंदू आणि हृदयात वसाहती
संबंध आयुष्याची देवघेव होऊन जाते उणीदुणी
इच्छांची दारं सताड उघडतात
मी हज्जारो वर्षापासूनची भिंत बसलो आहे तोडत
आणि ती होऊन बसली आहे अनादि अनार्य
तिच्या सभ्यतेचं लक्षण झालंय नग्नता
वस्त्रान झाकलेल्या गोष्टीला आपण
आभाळ तरी कस म्हणणार?
ती उघडीवाघडी होऊन स्वार झालीय
काळ्याशार अबलख घोडयावर
ती निघालीय शिलंगणाचं सोनं लुटायला
मीही रानटी अजागळ

# लामणदिवा

पिसं लावलेल्या बाणांनी करतो आहे
माझ्याच भक्ष्याची शिकार
शेकोटी पेटवून खेळतो आहे
आदिम गणनृत्य
दैदीप्यमान काळोख आणि अनंताची वृक्षराजी
पृथ्वीच्या रहस्यालाच होतो असा अलौकिक स्पर्श
दूर्वर रानात गहिवरलेला गावदल
पाण्यात अंतरंग उघडून बसल्यागत गोपी
खरंच आपण त्यांची वस्त्रं चोरायला नको होती
सूक्ष्म अणकुचीदार गुलाबाचा काटा
टचकन् घुसतो आपल्या अंतरात्म्यात
कोनफळी फुलांचा फुटून येतो हेमंत
सुखदु:खांच्या उघडझापीला पडते भुरळ
एक अनाघ्रात समुद्रकन्या खडकावर फुटून पसरते चौफर
मी काय देऊ तिच्या लखलखत्या लावण्याला
पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश
की धारदार तीक्ष्ण सुरीनं माझेच डोळे फोडून
करून टाकू तिला दान ?

## मायाबाजार

मी तुझ्या हातातले शस्त्र
किती उपयोगात आणायचे
एकदा तू ठरव !

बदनशिबाचा पाऊस
त्यात चौमुलखी वादळे
अवघ्या हिव्र्या रानात
कुणी उगाच उभा जळे
हृदयाचा संक्षिप्त संकेत :
या रक्तलोटापुढे
अडसर कसा टिकून राहील ?

स्वप्नांची घुंगरे नादांकित
मी सावरतो माझ्या सर्व
पोतराजी चिंध्या
मुजोर दिशांना करतो स्थिरस्थावर
ओढतो घोड्याचा सुसाट चाप
नवयुगाचे अश्वमेधी वारे
पंचतारांकित सुखाला जाते तुडवत

# मायाबाजार

अपयशाला सिद्धांत बनवून
जगणारे नकटे
नाक खाजवून त्यांना खिजवायला
माझ्याजवळ तेवढा फालतू वेळ कुठाय ?
मी असा चाकोरीबाहेरला माणूस
काळाशीही चित्पट करायची
माझी गरीब बापुडी इच्छा :
आपण आखाड्यात सुरक्षित रहा

मातीच्या फुलांची अस्मिता
आणि सारसर्वस्व
आणि पृथ्वीचे अमर्याद चरित्र
हा सर्व निचरा होऊन गेल्यानंतर
ती मला कडेवर उचलून घेईल
निष्पाप गोंडस मुलाचा पापा घ्यावा
तसे ती मला चुंबील

हेतूंच्या पलिकडचा असाही एक
मायाबाजार असतो
आपण उगाच
संशय घेणाऱ्याला
जागा कशाला ठेवायची
यापुढे ?

## डाळिंब

डाळिंब

अलक्ष्याचं द्वंद्वद्वीप
त्यावर उत्क्रांत होत जाणारं आकाश
आकाशात खेळते सवंगडी
तृप्तीच्या किनाऱ्याला कोण लागतं झुलवू ?
कातरपणात अशी कोण ठोकतं पाचर ?
पोरी, देहावरली चंद्रवेल बाजूला सार
तुझ्या ओठाचं फुटतं डाळिंब
कशाला मांडू चिरवेदनेविषयी चर्चा ?
अवडंबराचे पापुद्रे जाऊ देत गळून
सत्य आहे तुझी मिठी
सत्य आहे तुझा उष्ण श्वास
सत्य आहे तुझ्या देहाचा अंधार
मला अंधाराची सवय होऊ दे
असुरक्षिततेला किती घाबरतो माणूस ?
मला होऊ दे तुझ्या शून्यागारातला
बंदिवान
तुझ्या स्पर्शात शहारतात इथे ध्वनींचे वृक्ष
वाऱ्याच्या बासरीतला सांडला जातो इथे ईश्वर
कितीतरी दिवसांनी मी स्वतःचंच करू
लागलो आहे निरीक्षण
यापुढे एकही दुःखाची ओळ मी लिहिणार
नाही

## विघ्नमांडया

एरवी ठीकच आहे आपलं
आतूनच सगळीकडे गडबड चालू असते तेवढी
आहे नाहीच्या सीमेवर
शुभ्र शांतता
पर्यायाचं नसतं गाढव
नजर टिपते वितभरच्या वर्तुळाचं पोट
अनुकूलतेचा ताप
मूळ गवताच्या लखलखत्या पात्याचा
माझं हृदय पहात रहातं
त्रेधा तिरपीट
तू असतेस नसतेस माझ्याबरोबर
काळाची विसंगती
सोललेल्या त्वचेखाली चोळलं जातं मीठ
तरीही वाऱ्याचा स्पर्श जाणवू लागतो
बहुधा मी दूर नाही प्रेमापासून
अनंताच्या मातीत शरीराचं रोपटं
तुझ्या विघ्नमांडया सुखहर्त्या
माझ्या बाहुपाशात तुझा आत्मा
झेलला जातो मूकपणं
प्रेमाचं शेवटचं नाव असतं शांतता
प्रत्येक शांततेच्या खाली पेटलेला असतो
हिरोशिमी इच्छांचा सुरूंग
आणि काषाय रंग व्यापून रहातो
आसमंत...

# आपण फक्त

विपदेच्या वधगृहात कत्तल चालू असते
इच्छेच्या संभावनेला कुणीच वाली नसतो
सुखानंदाच्या शहरात
वाढू लागतं यातनांचं जंगल
आणि रात्रीची खामोशी
आरशाला तडा घालू लागते
आयुष्य घालून बस्तं डोळयांत सुर्मा
विलापाच्या वाळवंटात तहानेला डोळे फुटतात
मस्तिष्काचं अग्निस्वरूप
क्षितिजाला भिडू लागतं
मृगतृष्णेची लहर जळाला नग्न करू लागते
अनादिकालाच्या दरवाज्यावर
अव्यक्ताचं आक्रमण...

साक्षीदार म्हणून
आपण फक्त उजाड झालेलं घर पहात रहायचं...

# घोडे

सुसाट हिसळले आहेत
यातनांचे सात घोडे
चराचराला व्यापू लागली आहे
घनघोर, काळीशार उदास रात्र
विमुक्त उच्छृंखल लाटांना
समुद्र खेचू लागला आहे पोटात
एकांतिक झाडांमधून पसरू लागलं आहे
कारुण्य...

किती पळशील या तहानेपासून
किती पळशील या भुकेपासून
अनंतानं तुझ्या पदरात टाकलेलं दारिद्र्य
स्वतःच्या घराला लावून घे चूड
पेशी पेशी उठू दे पेटून
नसानसात भरला जाऊ दे लाव्हा
स्वतःतल्या स्वतःत जा राजरोस फुटून
नंतर कदाचित् वाऱ्याला कंठ फुटेल...

## काळोख

गुहा जातात काळोखानं भरून
थंड स्थितप्रज्ञ काळोख
ज्याच्या संवेदनेची नांगी तुटून पडलेली
शब्द कुर्तडू लागतात मनाला
तेजाबाची जीभ फिरू लागते प्रेतावरून
गहनगूढ होऊन जातो कबरीमधला अंधार
अजून तरी मी माझ्या आत्म्याचा लिलाव होऊ दिला नाही
चिक्कार वादळं पाहिलीत मी
चिखल नी सांडपाणी
नरक नी किडयांची रौरवं

खरंच, माझा कुणीही परमेश्वर नाही·
खरंच, माझा कुठलाही धर्म नाही.
मी उभ्या उभ्या
माझ्या नशिबाला लावले आहेत घोडे...
मी कुणापुढे
हात पसरू ?
मी कुणापुढे गुडघे टेकू ?
की होऊ स्वतःच्याच समोर
नखशिखांत विवस्त्र ?

# काळोख

या भाकरीसाठी
या विधानासाठी
या गाण्यासाठी
या पाण्यासाठी
माझ्या कितीएक पिढ्या बर्बाद...

लंगोटाचा हा असा टाका उसवलेला
एक जिगर ठेवून
मी माणूस म्हणून जगतो आहे
असत्याच्या गाभ्रांनी बेडापार केलेला
उभ्या इभ्रतीला यांनी इभं लावलेलं
जुलमांचा हैदोस
अन्यायाची न्यायालयं
आत दूर आत माझ्यात
माणूसपणासाठी आक्रोश चाललाय
या यतिमखान्यात
मी हरवून बसलोय स्वतःला
कुणीतरी मला शोधून काढेल काय ?

काळोखानं गुहा भरून जातायत
थंड स्थितप्रज्ञ काळोख
नदीच्या पाण्यासारखा वाहतो आहे
संथ अथांग...

## गांडू बगीचा १

ना फुलं आहेत
ना पानं
ना झाडं आहेत ना पक्षी
नुसताच अहले करमचा तमाशा
मोहरबंद कस्तुरीचा गंध
पायातल्या शृंखलांचंच अस्सं
संगीतात रूपांतर...

हे दीदारे-यार, हे अहले-चमन

कुठल्या गोष्टींची जिक्र करू मी
तुझ्या भावभूमीत हा असा अश्रूंचा पूर
सकाळ संध्याकाळ
तुझ्या उजाड सुनसान
मैदानात होमगार्डची परेड
एखाद्या सणावाराला लवंडेबाज
कौन्सिलराचं प्रवचन
यल्लमाची नाचरी घागर
आणि स्त्रियांचं अखिल भारतीय संमेलन...

सडकछाप रांडांच्या शिबिरात
डल्ल्यांची कैफियत
ऐकत बसलेले सियासती कावळे
चरसी गंजडी
पिकपॉकिटर आणि चोर
दुःखित हृदयाच्या नश्वरतेचं जंगल
गांडू बगीचा
कुठल्या उदास प्रहरी तू
असा मुळावर आला आहेस





प्रशंसा आणि निंदा
चेतना आणि कान
अनंत काळचा अंधार
आणि सोनेरी किनारा
प्रलयाचा शोर
आणि
हिऱ्यांचा नश्तर
गुप्त प्रेमाचं लांछन आणि
उद्विग्नतेचा प्राण
विरहाचा यमलोक नी हमदर्दीचं स्मशान
पराकाष्ठेचा एकांत आणि भयभीताची जादू
प्रत्येक शब्दाच्या पाठीमागे
लपलेला आहे एक नागडा चेहरा
या बिछान्यातल्या गुलामांना मी जुंपू काय नांगराला ?

गांडूबगीचा
तुझं अतृप्त यक्षनगर

यातनांचा मुकुट मी वाहतो आहे शिरावर
आफ्रिकन दु:खाचं तेजस्वी कारंजं
जखमेनं केलं आहे माझ्या हृदयात घर
ज्यांची दारं शब्दांनाही उघडता येत नाहीत
किरणांचं अस्वल घेऊन फिरतं आहे बॅनर
कशाचीच घेतली जात नाही फिर्याद
माझ्यासारखा भणंग फाटका कवी
अपभ्रंशाच्या संदलमध्ये नाचू लागतो
ना घोषणा आहेत ना चित्कार

प्रत्येक करुणेचं तोंड काळचा बुरख्यानं झाकलेलं
तू तुझ्या पददलित आयुष्याला आत्मरौरवाच्या पाण्यात
अस्सं पोहू देतायेस
अतीताच्या बगला खाजवण्याशिवाय आता झाडांनी तरी
दुसरं काय कराव ?
मातीच्या गर्भाशयातला अंधार मला डोळचानं भरून
घेऊ दे
माझ्या सुग्रीव स्वप्नांचं विभोर नाणं
मला छन्नपणं वाजवून घेऊ दे
समकालीन व्याकुळतेचं आकाश एकदाच मला लिंपून
टाकू दे

शुभ्र कफन पांघरून
निराकार शांतता झोपली आहे तुझ्या अंगणात
आणि बाराखडीमधल्या मूळव्याधीची वाढते आहे व्याजोक्ती
हिरवळीला लळा लावू पहातं डुकराचं कबरं पिलू...
चांगल्यावाईटातलं नपुंसकत्व
केसांच्या लडीतून फिरताहेत अपौरुषेय बोटं
स्खलनांच्या मध्यरात्री धुडगूस घालताहेत
जाफराबादी म्हैशी
त्यांना हाताळणाऱ्या धन्वंतरींना जडलाय लकवा
ऐन्याच्या शाळेत हा असा झाला आहे बैना...
किती रूपं पहायची आपणच आपली ?

घोडे गोंदवले जातायत बाहूंवर
शिश्नवेलीला फुटू लागलं आहे फूल
सौभाग्यवती होतेय इब्सेनची डॉल
सारीच
चक्रव्यूहातली व्याकुळता
काळं सत्य बसू पहातंय कासवाच्या पाठीवर
नीतीमार्गावरून वाहणाऱ्या तुझ्या घालमेलीचे मोतीबिंदू
त्यानंतर आठवतायत मला तुझे मौन ओठ
तुझ्या विकल शरीराचा नाकतोडा
घेतो आहे पंख रंगवून
झाडातल्या डोलीतलं घुबड लावून बसतं षड्ज
तू तर तुझ्या संवेदनेचं दारच खोलायला मागत नाहीस
आश्चर्यचकिताचा बूट घालू काय माझ्या लंगड्या पायात ?
मांजरीच्या गळ्यात बांधू काय घंटा ?
की एका असहच विरूपाला टाकू खुरपून ?
प्रारंभ आणि अंत यांमधली मालवून टाकू काय
ज्योत ?

# गांडू बगीचा २



बगीचा आता आठवणींचा राहिला नाही
मेरे दोस्त
जरा भुनके दे यह मेरा फटा हुआ हृदय

मर्यादांचा लक्ष्मण भरतो आहे तळी
कबाबवाला नबाब तोडतो आहे लंगर
काळ धुतो आहे धुणी
दोन टाक्यावर
एक झवबा इच्छेला लावतो आहे झांकण...
एकांताला स्पर्शू लागला आहे
कर्मण्येवाधिकारस्तेचा किडा
कर्मयोगाचं अपंग झुरळ
उगीचच उकरतंय माती
ग्रीष्माचं पान सोलून काढतंय त्वचेला
स्खलनाचं जावळ त्यानं कधीच कापून टाकलंय
भ्रमाचा कंडोम त्यानं कधीच फोडून टाकलाय
मग या इजारी अशा, उघडयावर का वाळत घातल्यायत?

बगीचा आता आठवणींचा राहिला नाही
मेरे दोस्त
जरा भुनके दे यह मेरा फटा हुआ हृदय

## गांडू बगीचा ३



रस्ता निर्मनुष्य आहे
आणि तुझं गवत झुळझुळ वाहतंय

पहिलटकरीण
स्पर्शाची आठवण...

खार हालवते आहे शेपटी
पक्षी करताहेत अलार्म
तुझ्यातल्या फुलांना मरणोत्तर मिळतंय अनुदान
विजेच्या तारेवर झोपलं आहे भूत
पिला हाऊसा, तू हरवलं आहे गॅलिलिओचं घडयाळ
विधवेच्या मनांत झुलतंय पुंकेसर
आठवर भुंगा खेळतोय कबड्डी
झोळीतला लुळापांगळा खुर्दा ओढतोय गर्दा
उरल्यासुरल्या मांसाचे महारोगी तोडतोय लचके
राष्ट्रगीताच्या तालावर
समलिंगी उरकतो आहे खोदकाम

रस्ता निर्मनुष्य आहे
आणि तुझं गवत झुळझुळ वाहतंय...

## सनातन बाग आणि मी

सनातन बागेतले ईव्ह आदम
आणि एक मिरॅकल फ्रूट
कुठं मुक्त होता आलं या पापातून माणसाला
हजारो लाखो कोटी कोटी प्रकाशवर्षं
पाण्याचे खडक नी खडकाचं पाणी
प्रचंड उसळलेल्या लाव्हचाचं मऊ लुसलुशीत गवत
तरीही ही खेचरं आणि ही पापाची ओझी
माझ्या बागेतली फुलं तरी का असावीत निष्पाप ?
अजबाचा बाप्तिस्मा
होली वॉटरचा अभिषेक
अंतरंगातून जळत राहणारं
अवघं अंतरीक्ष गांजलेलं
झाडाझाडात महद् अंतर
झाडाझाडागणिक यातना तृष्णा
पानाफुलांत आरपार डंख
ऋतुचक्र षड्विकारांचं
माझा शिशिर : माझा हेमंत
कुणाकुणाच्या मुळाला हात घालावा ?

काळनदीच्या प्रवाहासोबत वाहवल्या माझ्या कित्येक पिढ्यांच्या वेदना
Walk with time
माझ्या चॅपलिनचा बूटच फाटकातुटका
माझ्या दरिद्रीनारायणाच्या विदुषकी लीला
त्यात प्राक्तनाचा फुटका आयना
निर्वाहातला खडतर संघर्ष
दाण्यापाण्याचं येजीस
माझ्या शोकांतिकेला या वास्तवात जागा नाही
आत्मरक्षणातूनच घडत गेलं माझं आत्मचरित्र
माझ्या उकललेल्या टाचांत मला भरता आलं नाही कैलासजीवन
मी माझ्यापुरता उभा केला प्रतिनिसर्ग
वेळेकाळेला मीही वागलो श्वापदांसारखा
जलचर-चतुष्पाद-सस्तन-सरपटणाऱ्या प्राण्यांसारखा
महासागरासमोर मी पूर्ण नागडा झालो
मी जोखून घेतल्या माझ्यातल्या मर्यादा
संबंधा-संबंधातल्या डोंगर-दऱ्या :
ऊनवाऱ्यांमध्ये हरवलेल्या दिशा
दुरितांचा मायाबाजार
तिमिराचा तमाशा
नरमादी
आईबाप
भाऊबहीण
मुलगामुलगी
काकाकाकी
मामामावशी
हया अनंताच्या झाडाला कुठलं फळ येईल ?

पांढरे शुभ्र घोडे कुठल्या मैदानातून धावतील ?
श्वासोच्छ्वासाची अनाहत बासरी
कुतरी-मांजरं
हसरी फुलपाखरं
मोर-हरणं
वाघ-सिंह
प्रलय नी महायुद्ध
कंपोस्ट खतं नी निरंकार माती
लोभामत्सरांच्या अंतरवेली
प्रेम आणि भुकेचा झिरझिरीत पडदा
या आदिसत्तेला भोगू दे जीवनाचा निरंकुश शाप
अलौकिकाच्या बागेविषयी मला विचारू नका
मी माझ्या बागेला घातलं नाही कुंपण
माझ्या दारातल्या इंद्रधनुष्याची पालवी कुणीही न्यावी खुडून

घनघोर नश्वररात्र खेळते आहे संमोहनाच्या फडात
अकाली आला आहे माझा प्राण कंठाशी
आत्मशोधाच्या प्रकाशानं
माझं हृदय निघालं आहे ढवळून
निर्बंधांच्या सर्वच भिंती मी टाकल्या आहेत पाडून
मला अंधारातही सर्व कांही दिसतं
अनाथाचा नाथ उभा पारशी
अरे कुणीतरी धरा त्याच्या माथ्यावर
human being ची छत्री :
या महानगरातल्या प्रदूषणानं
प्रत्येकाचेच डोळे झाले आहेत अधू

खरंच आता
पापी लोकांच्या भल्यासाठी
येशू पुन्हा क्रुसावर चढणार नाही
हे कालचक्रांच्या अनामिक मालका
तू चालवू नकोस तुझ्या कृपेचं खुरपं माझ्या पिकातून
तुझ्या दयेचं बांडगूळ उगीचच जखडू लागतं मला
एरवी

## लळीत

चांदणं खेळत ऱ्हातं पापण्यांवर
तुझ्या हाकेबरोबर
उठतात अंतरंगात तरंग
आणि मिळतो माझ्यातल्या व्याकुळतेला वाव
तुझं गव्हाचं शेत कस्सं हिरवं कंच
तुझ्या मक्याचा दाणा कसा टचटचीत दुधाळ
पराकाष्ठेपलीकडचं तुझं अप्रूप लळीत...

तू माझं रक्त जाणतेस
नी माझ्या अश्रूंना ओळखतेस
एकांताचं रम्य मनोहर गवत
घनदाट वृक्षाच्या छायेत
जखमेचं रूपांतर होऊ लागतं
अस्तित्वाच्या छळछावण्यांतून
कैद्याची मुक्तता
आर्ततेला फुटू लागतो नाद
साता समुद्रांतून खेळू लागतं पाणी

''कि हाल है बादशो ?''
''चंगे है''
''कि हाल है बादशो ?''
''त्वोडी दुआ है !''

## फाल्गुन

शस्त्रांना धार लावून घे
तुझ्या धगधगत्या अस्पृश्य विचारांची तोहमत...

कुठं आत्महत्येच्या नादी लागतोस ?
संसदेत हिजड्यांचा नंगा नाच...
इथल्या बेकसूर मरणांची उत्तरं
तुला अशी मिळणार नाहीत
एका आवश्यक हिंसेसाठी उचल तुझा हात
उगार स्वत:च्या आत्महत्येविरुद्ध बंड
ही असली वसंताची गाणी कुणाच्या गांडीत घालायचीत ?

झुकलेली मान ताठ कर
सूर्याच्या डोळ्याला डोळा भिडव
तुझ्या पुरुषार्थावर चढलेलं गचपान वारून टाक
तुझ्या जिवंत रक्ताला पुन्हा एकदा हाकार
तू वावर खुल्लम् खुल्ला खुनी म्हणून
मग समस्त भुकेल्या आतड्यांची होऊन जाईल बासरी
आणि भुकेच्या अंगणात नाचू लागतील मोर
पावसाच्या पहिल्या सरीसारखे...

# प्रतीक्षा

रिक्त महानगर आणि दीर्घव्याळ रात्रीचं सरोवर
जडशीळ आहेत पापण्या आणि अहंकाराचे दरवाजे मिटते
तर जळतच राहणार हे पाणी
आपण कशाला जपायचं आपलं हळवेपण ?
तुझ्या नाजुकपणाच्या प्रदेशात हुंदडतो आहे पाऊस
छूमंतर आकाशानंतर पारदर्शीपणालाच लागतं आहे इभं
नदयांच्या माध्यमातून आपण मिळतो आहो अरबी समुद्राला
काळाची नागीण घुमते आहे नागमोडी
उद्या भल्या प्रहरी होईल जहाजाचं आगमन
आपण पाण्याच्या अंतरंगात मिटता मिटता
प्रतीक्षा करायची रिक्त महानगराच्या अनुकंपेसाठी

# संवेदना ओढते ओरखडा

विस्फोटाच्या क्षणी अडथळा होतो किरणांना
डोळे करू लागतात घोड्यांची हत्या
एका ज्योतीत सामावलं जातं आकाश
आणि हवेचं शेत अस्सं नांगरून पडतं बेवारस
श्वासाखाली संवेदना ओढते ओरखडा रात्रीच्या देहावरून

स्वनातीत अस्तित्वाची राख
विखुरते निर्दयी खडकांवर
जमिनीचं होऊन जातं अस्सं पाषाणात रूपांतर
अग्नी आणि ध्वनीशिवाय राख आणि वारा वाहतो आहे
या बगिच्यात हे संवादाचं झाड कुणी लावलं आहे ?
मरणाला मारून हे बीज कुठं चाललंय ?
दोन रात्रींच्या मध्ये माझाही एक दिवस
अंधाराचं मीठ अंधाराची भाकरी
तुम्ही जोडून टाका मला दीर्घ शांततेशी

# आईच्या बांगड्या

आपल्याही
आईच्या बांगड्या छनछन वाजतात

तहानेनं मारली जाते तहान
भुकेनं भूक
आणि मढवला जातो असा सालंकृत पाषाण
''मोसम कोन कुटिल कामी''
आपण शोधू आपल्यासाठी एक प्रार्थना
तुकारामबुवा म्हणाले होते
''जीवींचे मारावे आईबाप
आणि धरावे गाढवाचे पाय ''
आता कस्सं ठेवायचं भविष्याच्या नाडीवर बोट ?
आकाश आहे सादळलेलं
बोथटाचं बोट धरून संवेदना झाली आहे कोडगी
घुम्मकडपणाच्या कफनीशिवाय
काय आहे इथं आपलं ?

अंकुरल्या बिजा नाही पाणी
वांझ गाणी स्वातंत्र्याची
नकट्यानं दाऊ नये आरशाला तोंड
आपलीच सोंड लोंबणारी त्रिलोकी
झाटांचा भार खांद्यावरून वाहत
निरर्थक भटकलो आपण या देशात

... हा समुद्र कधीकाळी शांत झोपणार आहे की नाही ?
आपण झालो आहोत पोरके निराश्रित
हा देशच झाला आहे छळछावणी
काय घडलं अस्सं
की ज्यामुळे आपआपल्या मनांत अंधार झाला ?
... लय प्रलय आणि रोजच्या यथार्थ मरणाची
अवहेलना...
दुसऱ्याला दोष काय म्हणून द्यायचा ?

आपल्याही आईच्या बांगड्या छनछन वाजतात

## काळी जादू

अनभिज्ञ दारातून
स्वप्नं येतात आपल्यापर्यंत

कितीकाळ
किती दूरपर्यंत इच्छांचे वारे घोंगावत रहातात
कृत्रिम ग्रहावरून फेकल्या जातात नृत्यलहरी
काळयाकभिन्न मेघमल्हारावर काल कोण झालं व्हतं स्वार
शतकानुशतकांचं अलगुज वाजवीत
कोण आलं होतं आपल्या अनाथ बगिच्यात

अस्पृश्य माझ्या चेरीची फुलं
मी पक्ष्यांसोबत गाणं गाताना पाहिलंय माणसांना
त्यानंतरही नरसंहार येथे सुरूच आहे
ऋतूंचा अनुताप मी साठवला माझ्या हृदयात
एक अस्सा निरंकुश रक्तवंश जागवला मी
जीवनाचं मोल देऊन

कसायांच्या दारात गाय तुम्हीच बांधलीत
घराचे वासे तुम्हीच चोरून नेलेत
किती आंधळा अभिमान तुम्हाला गोऱ्या जादूचा ?
काळा जादूगार म्हणून माझी निभर्त्सना केलीत
मी पाहिलं फाटलेल्या आभाळाला टाके घालू
मी पाहिलं सुमद्राच्या अथांगतेला मोजू
मी म्हटला येथे सर्व युद्धांचा शेवट
एकेंक शब्द मंत्रासारखा भारून टाकला मी
कल्पनेशी व्यभिचार करणाऱ्या अवदसांचं
मी केलं वस्त्रहरण

जळून गेलेल्या वृक्षांना मी देऊ केलं अहेवपण
इथल्या बेबंद जलाशयांना मी देऊ केली माणुसकी
जे शासन द्यायचे असेल मला ते द्या
मी आहे पवित्र्यात उभा
मला कशाचीच भीती वाटत नाही
कारण मीही शिकलो आहे काळी जादू

# एक उधळलेला घोडा

नागडया अनंतानंतर मी पाहिलेला एक उधळलेला घोडा
दोन हृदयांतलं निरंतर विष त्याचा नाल
वैश्विकतेच्या शेतांचा फुटून जातो डोळा
दहा देवांचा एक क्लोजअप दूषित करतो स्वप्नांना
स्वप्नं तरी शेवटी काय असतात ?
घोडयाच्या घोडवळीला लोळणारी प्लॅनेट्स
मनातल्या सुप्त अवस्था
एक उध्दट तंग नखशिखांत शाळीग्राम
मुक्त पाषाणातली अनाथ लोरी
मध्यरात्री जख्मी झालेली शांतता
निरागस कारंजं कुणाच्या वेदनेवर सांडणार
देहाचा वेध घेणारे निरंकुशाचे खिळे
आपण बसवून घ्यावं आपल्या दु:खाला लाकूड
संतसमागमासाठी गवत करावं मोकळं
शोकात्मिकतेच्या योनीत निजवावी निद्रा
अभद्राच्या हातावर रेखावी मेंदी
त्वचेत्वचेची ध्वजा काढावी नांगरून
आणि स्खलनातंल्या भादव्यात विसरावीत आठवर दु:खं

नागडया अनंतानंतर मी पाहिलेला एक घोडा
अंतर्मनातल्या जखमेवर नाचणारा क्रूर

# मुक्ती

काळ्या हातांनी त्यांनी घोटला चंद्राचा गळा
चंद्र : जो येऊ पहात होता सनातन मेघांच्या
अवडंबरातून बाहेर

एका थोर प्रकाशासाठी
आम्ही स्वीकारलं चालता चालता मरण
तरीही
या न्यूट्रल पारदर्शकतेतून काहीच शिरू शकलं नाही आरपार
माणसाच्या जथ्यांना जेरबंद करणारी श्वापदांची अधिसत्ता
हवेच्या एकएका कणावर त्यांचा ताबा
पाण्याच्या थेंबाथेंबाला मनुष्य मोताद
चिटपाखरू गाईल कसं इथे ?
कृपावंत आकाशच त्यांनी बंद करून ठेवलं काचेत
समुद्रानं धुतलं नाही आदिम दुःखाचं पाप
पोरकेपणावर वृक्षांनी धरली नाही सावली
जळती गावं जळती शहरं
कुणी : कुणासाठी : किती रडावं

रंडीबाज ईश्वराच्या आई
बघ तुझ्या व्यभिचाराचं अंतरंग
तुझ्या अनौरसपणाच्या वेलीला
कुठल्या अमानुषपणाचं फूल आलं आहे ते
टाकीचे घाव गेले आहेत काळवंडून
प्रार्थना ठरल्या आहेत निष्फळ
तुझ्या देवपणाचा रंग जातो आहे उडून
याही अवस्थेत हे फारंच शुभकारक
मानतो मी

# दावणीची गोष्ट

नरकातून बाहेर पडलो
त्याची कुठेही नाही दादफिर्याद
''शोषण''
बेंबीच्या देठांपासून हसता आहात तुम्ही
निर्भत्र्सना करता आहात माझी तुम्ही
खरंच
मी चावलो आहे पिसाळलेल्या कुत्र्याला
इंद्राच्या अंडाला धरून पृथ्वीवर उतरणारे तुम्ही
मी तुम्हाला कशाला डिवचू ?
गल्लीबोळातून रस्त्यारस्त्यातून अंतर्पीडेचा कलरव गुंजतो आहे
विफलतेचं भूत अंगावरले कपडे फाडून रडतं आहे
इथेच कुठेतरी आजूबाजूला तहाची आहे जागा
फार बरं केलंत
मलाही दावणीला बांधलंत

# घटना

काल रात्री मी असा माझ्यातून निघून गेलो
तरीही माझ्या अस्तित्वाचं वासरू वाफाडत राहिलं
दाहीदिशा :
कालचक्रांच्या दीर्घ नजरेतून मी उसवून पाहिला
हवेचा चेहरा
तर महासागरातून लक्कन उमलून आलं पृथ्वीचं बेट
तरीही
सूर्य सांडला विषभरल्या ग्लासात
एकाकी थंड बिछान्यात रात्रीनं न्याहळलं निद्रेला
लैंगिकतेची कवचकुंडलं पांघरली देहावर
दिक्काळ दळत राहिला स्तब्ध शांततेला
काळोख सूत कातत बसला
उघडले गेले आतले बाहेरले सर्व बंद दरवाजे
फटाफट फुटले फुगे
आत्मरताचं व्याकरण पडलं गळून
नितळ त्वचेवरून पाणी वाहू लागलं
प्रकाशाचा झाडालाच अशी आकस्मित आग लागली

## पाऊस

खिडकीची प्रतिमा उद्ध्वस्त करून
उधळतो पावसाचा घोडा
सारा खळमळ धुवून गेला या वळवाच्या पावसात
गर्गरभवरीची पन्हाळ – कुठले लवकुश याच्या
लगामाला हात घालतील ?
हवेच्या पृष्ठावर उठवीत आर्त चिन्ह
धिंगताल धावतो दाहीदिशा
याच्या बेभान रक्तापुढे कळचा कुचकामी
माझ्यातला षंढपणा यानं आपल्या टाचांखाली
काढला चेचून
मीही याच्यासारखाच झालोय पाणीदार वारू
माझ्याही जखमांमधल्या अनावर हाकांनी
धारण केलंय मूर्ताचं रूप
भिटून चाल्लाय रानावनांचा रुद्रघोर
आता
शेंडी तुटो
अथवा
पारंबी

# तू

या रक्ताला दारचं नाहीत
त्वचेखाली अशी रक्ताला पालवी फुटते
मातीची छाती स्वप्नात विभ्रमलेली
हिणवलेली रूपगोजरी
या कर्करोगातून सुटू पहाणारा चंद्र
आकाशाच्या आरश्यात तुझ्या चेहऱ्याचं रोपटं
सत्याच्या बाजूला ओढत नेतोयस मला
विपदेच्या आगरातून बाहेर काढतोयस मला
तुझे शब्द ईश्वराची अवज्ञा करणारे
प्रशंसेच्या पलिकडली तुझी जन्नत
आता कशाला स्वीकारलं जाईल जहन्नमचं आमंत्रण
तू दिशांचा स्वामी
तू माझ्या जमिनीचा मालक
कालातीत सृजनाचा सारथी
सर्वऋतूंत मला व्यापून रहाणारा कलावंत तू

## कविता



इच्छाआकांक्षांचं तुझं सुंदर शेत
मी तुझी रीत बदलून
हालचालीच्या दिशेनं चालतो
षड्विकारांचा रत्नहार
पचेंद्रियांची दारं
तू अर्थानर्थाचा उत्सव
प्रत्येक वळणावर

# मूर्तामूर्त

या दांभिकांच्या दुनियेत
किती सहन करायची मनाची स्तब्धता

तू महाकालीचे प्रचंड रूप
शोक आणि मोह यापलिकडची तुझी वैकुंठे
ही अनंतसत्ता तुझ्या नावाची
आत्ता हे स्मरण तुझे
तू सर्वज्ञ, कवींसारखा
तू मला असा प्रकाशात आणतोस नी पवित्र
करून सोडतोस

तू क्रांतिदर्शी आदित्य
तू शुभसंकल्पनांची गती
विचार आणि विषयांची व्यंकटी सांडती
तू माझ्या मनातला महात्मा करतोस जागा
गदगदून सोडतोस कल्पवृक्षास
आणि करतोस विसर्गाचे प्रदान
भूत-भाव-उद्भव
मूर्तामूर्त

# विजनात

या अशक्यतेच्या भिंती तुटू दे गडचा

वेळेचा भुजंग डोलता
हातचं राखून दूर उभा मृत्यू
आयुष्य म्हणजे नाही हे स्वप्न
इथे खडतरातून उगवतात पेंग्विन
तू उघड तुझा पॅनोरामा
होऊदे तुझा बँडबॉक्स इन्श्युअर्ड
चुंबनांचा हंगाम येतो आहे वर्दळीस
सूर्यकुलाची मुळाक्षरं तुडवली जातायत
वेदनेची ज्योत पालवू लागते आहे
सूक्ष्मदर्शकात खारींचं नृत्य
ऐन विजनात शब्दांचा काहूर
तुझ्यासाठी

# भोगतृष्णा

एकमेकांच्यासाठी इथं कुठायत आत्मसमर्पणं
नाहीतर ही दुनियाच झाली अस्ती
सूक्ष्म
स्थूल
उत्पत्ती-स्थिती-लय
आम्ही करतो आमच्याच शरीराचा सत्कार
पूजतो अखंड प्रकृति-पुरुष
भोगतृष्णेच्या अलिकडे पलिकडे
जो होतो आत्मप्रतीत

## ओळख

किती विलक्षण तुझ्या सृष्टीची अद्भुतता
भ्रांत होतो–लुब्ध होतो–अर्थाअनर्थापलिकडे
कला कुसर दुस्तर
तुझ्या मायेची घागर
तुझ्या मूळ रूपाला कस्सं विसरता येईल ?
या अनंत गोष्टी
घरदार-बागबगीचे-शिल्पं आणि चित्रं
खरंच ही जागा माझी आहे
वृक्ष-वनस्पती-मनुष्य-पशुपक्षी
स्थावर जंगमादि
या सर्वांनंतर मीही ओळखू लागलो आहे
माझ्या अविनाशी देहाला
तू स्वच्छता कर आणि वाढव मनाची शोभा
एकच अव्यय आनंद
होऊ दे तुझ्या शक्तीनं निराकरण
दुःख-कष्ट-आपत्तीनं इथे मी जर्जर

# भाऊचा धक्का

भाऊच्या धक्याला या लाटा टकरा घेताहेत

जरा बंद करशील का
तुझा हा गेटवे ऑफ इंडिया

दगडी फुटपाथ
रेडिओ क्लब
होलसेलीचं बीफ

डॉगमास्टर खाजवतोय
आयुक्ताचं केळं
मुझियमची फिंदरी इचकतेय दाणा
विधिमंडळांत चाललंय हरिभजन
बापूजींचा पुतळा पितोय शिवांबू
एकनाथांची बकरी बसली आहे त्यांच्या पायावर
दाती तृण धरून रखवालदार पादतो आहे झमेलं
किती गोष्टींचा विमा उतरवायचा
Indian Express च्या कागदानं
आपलं ढुंगण पुसलेलं बरं
राज्यपालांच्या दारात आपलं हागलेलं बरं

# गुन्हा

नितांत करुण तर्कापलिकडचा समुद्र
कालच्या अमोघ रात्री
ऋतू बदलले
फुलपाखरांच्या शवावरून
वाजत गाजत गेली निर्वासितांची फौज

असीम ग्लानीनंतर झाली आंधळी सकाळ
नोव्हेंबरातल्या देवदूतानं घातलं
सूर्यकृपेला कुंपण
तरीही अंतरंगाचं उघडलं प्रतिबिंब
विद्रोहाचं नारंगी पान डोलू लागलं वाऱ्यावर
महाकालाच्या दरवाज्यावर झाली टकटक
आदिप्रार्थनेच्या विलापानं ढवळलं अविचल पाणी
अंगावरली वस्त्रं उतरवून
जो तो किनाऱ्यावर उभा
घडतो आहे कित्येक दिवसांनंतर
दखलपात्र गुन्हा

# प्रेम

प्रेमच सोडून जातं अशी आपली जागा
चंद्राच्या तळच्यात पोहतो कासावीस मासा

तू सांग अश्रूंना मौनव्रत सोडायला
युगानुयुगं किती करत बसायची दु:खाची मशागत
या निष्पाप पोरांच्या हाती
किती ठेवायची स्वप्नं चवलीपावलीसारखी
सहज सापडावीत खनिजं
तशा या आया
सारवायला हव्यात त्यांच्या अंतरंगाच्या भिंती
तहानेला फुटणारा पान्हा
हा नग्नपणा किती जाहीर करत बसायचा ?
या रक्तातल्या वादळाला संसर्ग नको महारोगाचा
ऐरणीवर पडताहेत घाव
खुलू लागलं आहे हिऱ्याचं रूपडं
एक तीक्ष्ण पातं सरकतं आहे वरती
एका कुमारी वेदनेचा होतो आहे स्फोट
मावळतीला आले आहेत भेदभाव

अस्पृश्य बासरीचे स्वर पेटवताहेत चांदणं
या निळ्या बिछायतीवर तू होतो आहेस सगुण
पुन्हा येडचाबागडयांच्या दारूची नी भाकरीची
तू होतो आहेस सोय

प्रेमच सोडून जातं अशी आपली जागा
चंद्राच्या तळच्यात पोहतो कासावीस मासा

# शिल्प

तंतुवाद्यांचे स्वर विखुरतात इतस्ततः
सूर्याची निष्ठुर नखं
देवदूताच्या आशीर्वादाचं सफेद झूठ
त्यानंतरही तू सांगितलं होतंस
मला खरं बोलायला
माझ्या भोवतालच्या काचघरावर
ओघळत राहिले रक्तबिंदू
तेव्हा शिशिरच होता

तुझ्या ऋतुमती पावलांनी
मोडली क्लांत निद्रा सामुद्रिक सुगंधाची
तुझ्या देहाचं नक्षीदार वस्त्र
माझ्या गरीब बापडचा वस्तीची नजरच झाली काळी

क्रौंच पक्षी आणि संध्याकाळ
उत्तरदायीत्वाच्या शेतातून वाहतो निर्मलतेचा झरा
उपकंठाच्या काठाला स्पर्शतात पक्षी
आणि उभारलं जातं तुझ्या लाकडीपणाचं शिल्प

## स्वप्न

माझ्या स्वप्नात येतं झपाटलेलं एकांतिक झाड
जे करू पाहतं निराकाराचं शव-विच्छेदन
ते धरू पहातं सावली वेदनेच्या समुद्रावर
काळाच्या कुंडलीवर काल एक कावळा
गेला शिटून
त्यानंतर म्हटलं : पाहुण्यारावळ्यांसाठी काळा कुतरा मारीन
तर वेदनेच्या समुद्रानं ते कुतरंच टाकलं खाऊन
नंतर मी घालून पाहिली शपथ सीगल पक्ष्याला
तर त्याचा एकही पंख पाण्यानं भिजला नाही
म्हटलं पाण्यात राहून वैर कशाला
अवैरानं वैराला टाकावं जिंकून
तर माझंच झालं नीळकंठ कासव
वैषयिकतेच्या मंथनानं आरोग्यच गेलं बिघडून
झपाटलेल्या झाडाची पानंही गेली गळून
विराट वेदनेची होऊन गेली वाफ
आणि तिला
चिरविश्रांतीसाठी आकाशच शिल्लक राहिलं नाही

# शर्टाविषयीचा तर्क

यातनामय शृंगाराचा कालखंड ओलांडून
नाकारू परंपरागत रूढीचा बगीचा

ईव्हचं बदलू लिंग
ॲडमला ठेवू गर्भार
प्राणिसुलभ चिंतांपलिकडे घेऊन जाऊ तर्काला दूर
दलदलीचा नरक
ऋणानुबंधाच्या इतिहासातला चंद्र
दलाली करतो
नि:शरीराच्या गायरानात
वैषयिकतेचा वळू रवंथ करतो
बुडणाऱ्या जहाजात आपण बसतो
आणि रानटी होतो
साध्या लवंगेनंही आपलं तोंड भाजतं
नी आपल्याला प्रकाशाची भीती वाटते
मुक्तीच करते माणसाला असं शासन

माणसानं असू नये धुतल्या तांदळासारखं स्वच्छ
त्याच्या शर्टावर असावेत काही डाग
त्यानं पदराच्या गाठीला बांधावं थोडंसं पाप

# भीती

प्राचीन एकांततम
उत्तप्त फिनिक्स
बावा
सोयी हुई कलियोंको मत जगाना

सुबह बखैर
भल्या सकाळीच जळून जाईल
यातनेचं लाक्षागृह
कहाँपे चढ़ता है चादर ?
इच्छेचा संभार सांभाळत
डोलतो निवडुंग फणा
किती वाढलं
या जलपुरुषाच्या अवतीभवती शेवाळ
त्यात अशी सन्नाटयाची रात्र
एक पाऊल अंदर—एक पाऊल बाहर
युगांतराचं प्रशांत कुरण
फाल्गुनातल्या चांदण्याची एकांत भाषा
अनुच्चारित देवदार मासा
सांडतो पानाच्या शय्येवर
सुनीलाच्या शेतात वाढतं आकाश
ध्वनी-प्रतिध्वनींची वेल
वाऱ्याला जखडून टाकते
अलकनंदेच्या अरण्यात
माझ्या ऑर्फियसची बासरी सांडते

शून्यागारातली माझी वेदना
निर्वाक साक्षी
निःसीम अंतरंग
आरसा तर फुटून
गेला नाही ना ?



१

या पावसाच्या कक्षेतून तू अंग काढून घेतलं आहेस
पोहचती होऊदे अश्लीलता एकीकडून दुसरीकडे
मी तर भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे
धीरोदात्त जगण्याचे स्वप्नभ्रम
सत्याच्या पोटी असत्य पोसलं जातं इथे
नंतर उजवलं जातं भोळ्या सांबाच आकांडतांडव
विनापुच्छ भाषेचा सोजिरा उत्सव
अशात—तूही एकदा नाच गडे

२

मी तक्रार करू शकत नाही
अंत:करणाऱ्या गरजेची गोष्ट
आकारहीन शब्द नी अंतराळ
या दृष्टिपथात सद्‌गतीचा डवरता चेहरा
समजुतीचं मिंधं मांजर
त्यात खेळता विजेचा आंधळा घोडा
हस्तिदंती मनोऱ्याचा पाडाव करून
हवेची मुळं जमिनीत रुणझुणती
एका अजाण वर्तुळाची होते बंदिश
एक गुलबक्षी मुलगी सोलत रहाते
अंतरंगाचं डाळिंब



३

सूचिपर्णाची सावली
अजून जागीच आहे : मध्यान्ह रात्री
तारांगणांचं खळं खूप पिकलेलं
जखमेवरचा बर्फ बहुधा सांडला असेल
मुरलीचा स्वर बहुधा रक्तात पसरला असेल
पान गळतं आहे
एका स्वाभाविक मुलीसाठी
वाऱ्याच्या ओघात वाहतं अस्सं निळंभोर आकाश



४

वेदनेचा धागा असा तुटून जातो
पाय रुतून बसतो संगमरवराच्या चिखलात
भविष्य भेटायला निघून जातं गतकालाला
उद्याच्या थांब्यावर
चिट्पाखरूही थांबायला मागत नाही
हे माझ्या प्रेमा
हिरव्या रंगाचं सातवं ईप्सित तुझ्यासाठी

## आपण

अहि-नकुल युद्धातले आपण
सर्वचजण
शेवटी माण्संच करतात उष्टचा-खरकटचाच्या गोष्टी
तुझा एकारांत अहंकार
आणि माझा अस्पृश्य रियाज
शेवटी जुगलबंदी झालीच नाही

घोडामैदान जवळच होतं
पण आपण हरलोही नाही जिंकलोही नाही

मरणाला मांजर बनवता आलं अस्तं तर
किती छान झालं अस्तं

दारुडचांच्या महिफलीत आजही तुझं नाव निघतं
तुझ्या आठवणी काढून ते ढसाढसा पितात
डिकास्ट माणसा
तुझ्यासाठी घेऊन आलो होतो
उधार क्वार्टर
वाटलं विद्युत्‌दाहिनी सुरू होण्यापूर्वी
चिअर्स म्हणावं
भडकत्या ज्वालांसारखा रंग
दारूचा नी आयुष्याचा
डहाळीवरली चिमणी तू अशी उडू दिलीस
मोहाचं फूल तू अस्सं मुरू घातलंस
अहि-नकुल युद्धातले आपण सर्वचजण

# सावली

सावली चिरत जाते स्वतःच्याच अवयवाला

सुरांचं पोलाद वितळतं खडकांवर
नितंबावरल्या पाकिटात बंद करू नकोस
शांततेचं कबुतर
बेंबीच्या मैदानांत खेळतो काळा घोडा
लपवू नकोस त्याला झग्याखाली
डोळे मिटून बघ
झाडांच्या नसांत टसटसणारी काच
नग्न हिंस्रतेची लिही गाणी
पुष्कळाच्या वळूवर मार थाप
मरणानंतरची उदासी बिछान्यात काढ जागवून
अस्तित्वाच्या स्पर्शाला नेसव लुगडं
चेहऱ्याच्या जमिनीत लाव एक रोपटं
संवेदनेच्या कल्लोळाचे टोचून घे कान
सारवून टाक हृदयाला पडलेलं भोक
सावली चिरत जाते स्वतःच्याच अवयवाला

## व्यभिचाराविषयी

या अडचणींच्या ठिकाणी किती छान दिसतेस तू
अंधार अस्तो व्यभिचाराला साक्षी
मला तर उजेडांत आलिंगन द्यायला आवडतं

किती नाजूक वळणावर येऊन पोहचलो आपण
की पाहता पाहता प्रेमाचं व्यभिचारात रूपांतर झालं

भविष्याबद्दल मी तसा उदासीनच
तरीही तू मोजलीस माझ्या बोटावरली चक्रं
वर्तवलेस माझ्या नशिबाचे उंचसखल प्रदेश
तेव्हाही बाहेर पाऊसच पडत होता धुवांधार
कोसळत होते बेलगाम उत्तुंगधवल धबधबे

सर्व रानच अस्सं व्याकळून हिरवटून आलंय
पशुपक्षी गेलेयत चिंब भिजून
वीजेच्या तारेवरले स्फटिकबिंदू
दिगंताची अनामिक शीळ
या सर्वांवरून जान नोछावर करावी
फेकून द्यावं स्वतःला निरामयाच्या खोल दरीत
पाण्याच्या ओहळाचा मंद्र संतूर
पाण्याचे बावन्न नखरे

किती सुंदर खेळ खेळतं हे गढूळ पाणी
अंतर्यामाची वस्त्रं फेडून आपण झालोत दिगंबर
वारा प्यालेला बैल उकरतोय शिंगानं माती

मी काय करू या आठवणींचं
आणि जखमेवर चोळल्या जाणाऱ्या मिठाचं
कुठल्या नवीन जगाचा जन्म होणार आहे इथे
की आपणच होणार आहोत जळून भस्मसात
तू-मी नंतरचा कवितिक पाऊस
यापुढे
कुठे शोधायचा आपण ?

# रहस्य

कुठलंच रहस्य लपलं जाणार नाही इथे
तू सैल कर तुझी मिठी
वस्तुजाताचा आंधळा समुद्र पुन्हा एकदा टाक विंचरून
शब्दांची ध्यानसाधना आणि नजरेची समशेर
पुन्हा एकदा टाक परजून
जरी बिघडून गेला माझ्या नीतिमत्तेचा तोल
या अशक्त स्वातंत्र्यात पुन्हा एकदा टाक मला
नागवून
जर झालीच आहे सुरू गस्त पावसाची
तर या झाडाला विधवापण कशासाठी ?

# प्रश्नचिन्ह

मकर संक्रातीच्या वाघिणीवर
स्वार झालं माझं अष्टभुजा दु:ख
संस्कृत अभिजाताचा राक्षस
त्यानं तुडवला पायी

किती सांगावी निजदु:खाची बहुरूपं
त्याच्या तांडवातला आविष्कार
त्याच उघडंबंब लावण्य
कल्पांताला घालून जातं आंघोळ
माझ्यातल्या घाणेंद्रियाचं गवत
होऊन जातं स्वच्छ निर्जंतुक
तुम्ही सनातन कर्मठ लोक
या क्रियेला पवित्र वगैरे म्हंता
''इच्छेची हलते दोरी
तपेली संभाळ पोरी
तपेलीची लांब दोरी

भरती-ओहोटीतलं जंगल
व्यक्ति-समष्टी
अहर्निश अशाश्वताचं वाळवंट
आपल्या अस्तित्वाचा उंट हरवून जातो त्यात
त्याच्या नस्तित्वाचं अहेतुक प्रश्नोपनिषद
संस्कृतीतली सभ्यता डावलून
उगीच छळतं आपल्याला
सोत्पन्नातलं जड-चेतन
क-ख-ग मधल्या सम्यक ज्ञानाची अर्हतता :



निर्वाणाच्या पाण्यात बसते म्हैस
मी कशाला अकारण घंटा वाजवून
जागवू जखमेला
मी जाणतो माझ्यातल्या अनात्म्याला
अनीश्वराच्या शेतात जो वाढला मुबलक
त्यानंतरच्या सजग मनाला मी देत नाही
राउळाची उपमा
उत्प्रेक्षांचे अलंकार मी चढवत नाही त्यावर
ते निसटत रहातं हातातून पाऱ्यासारखं
पारदर्शी अपार
क्रोधाला शांती
हिंसेला अहिंसा
असत्याला सत्य
कस्सं जिंकतं ?
माझ्याजवळ याचं कुठलंच उत्तर नाही
तादात्म्याची अघोर व्यंजना
मीही पाहिलाय
पूर्वेकडून पश्चिमेकडे उधळत गेलेला
चक्रवर्ती घोडा
हचा असल्या करुणपणाला
कुठल्या नावानं हाकारावं ?
की आपणच आपल्याला
द्यावी तडी ?

# क्रौर्य

मी भाषेच्या गुप्तांगातला उपदंश
लाखो उदास-करुण डोळ्यांतल्या
चैतन्यानं मला टाकलं आहे हादरवून
माझ्यातल्या विद्रोहानं मी चाल्लो आहे मोडून
कुठंही चांदणं नाही
कुठंही पाणी नाही
पिसाळलेला कोल्हा रुतवतो आहे माझ्या देहात दात
आणि एक भयाण क्रौर्य माझ्या माकडहाडातून
विषासारखं पसरतं आहे

आत्मरौरवाच्या नरकातून मला बाहेर पडू द्या
या ताऱ्यांच्या प्रेमात मला पडू द्या
व्हायलेटचं फुल रांगू लागताहे दिशांत
तडकलेल्या चेहऱ्यावर उगवून येतंय ओयासीस
अक्षय योन्यांतून घुसळतंय चक्रीवादळ
दुःखाचे केस विंचरू लागलं आहे मांजर
रात्र करून देते आहे माझ्यातल्या विक्षुब्धतेला वाव
खिडकीच्या डोळ्यात नाचतंय बेवारशी कुत्रं
शहामृगाची चोच फोडतेय भंगाराला
भौतिकाची चव घेतंय इजिप्शियन गाजर
कविता उठवते आहे कबरीतून प्रेताला
आत्म्याची दारं अशी बंद होतायत पटापट

सर्वनामांतून खेळतंय रक्त
व्याकरणाच्या भिंतीपलिकडून माझा दिवस उगवतोय
सर्जनाच्या शय्येवर सांडतेय परमेश्वराची विष्टा
तंदूरची रोटी आणि वेदना भाजली जातेय विस्तवावर
पुराणकथातून नांदतेय वस्त्रहीनाची ज्योत
छिनालपणाचा दगड भिडतो आहे मुळांना
लंगड्या पायावर उभा रहातो आहे निःश्वास
दीर्घ पोकळीला वाजवू लागतो सैतान
इच्छेच्या दारावर हलू लागतं तरुण हिरवं पान
टाके घातले जातात निराशेच्या शवाला
निरंतराच्या पुतळ्याला हेपले देते आहे मनोरुग्ण प्रतिभा
कवचाला सोलते धूळ
अंधाराचा सांडतो मंदिल
तू डोळे उघड : या पूर्वीच्याच संज्ञा
खाडी भरून येतेय पाण्यानं
किनाऱ्याला शिवतायत लाटा

तरीही माझ्या माकडहाडातून विषासारखं पसरतंय क्रौर्य

नर्मदेच्या पाण्यासारखं नीतळ : स्वच्छ

## ध्वनी

ध्वनी तुझ्या अपेक्षेचा
कशाला हरकतीच्या भिंतीआड
लक्षणीय चुंबनं आणि त्यांचे व्रण
अनाघ्रात भाषेचे जीवजंतू सर्वत्र
ध्वजासारखं तडफडणारं मन
तुझं बंदर रेशीमसूत आठवणींचं
कठिणतमापलिकडची तृष्णेची जखम
जो होईल निर्णायक
तोच खरा म्हणायचा बिछान्यावरती निर्णायक खेळ

आशेच्या पलिकडे रुजणारं स्वप्नाचं वास्तव
बस्स झालं भविष्य आणि बी-बियाणांच्या लागवडी
समाप्तीचं रामायण भूतकाळाच्या पश्चात्तापानंतर
अजून तर भिडायचं आहे सर्वस्वानिशी
त्यात असणारच तर असू दे
तेवढाच जातिवंत अपंग वनवासी वर्तमान

# हंगामाचं कुत्रं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
संदर्भ शाखा (ठाणे)

हे सुनेपण
असं छळत रहातं
सर्व
ब्रह्मांडच गिर गिर भवरी
कुठल्या धर्तीचं तू प्रेम करतेयस ?
कुठल्या उत्पीडिताचा तू उद्धार करतेयस
कंच्या
वसंताचे तू पाय धूतेस
कंच्या
पानांवरले तू मोती वेचतेस
प्रत्येक झाडावर
लघवी करत जाणारं हंगामाचं कुत्रं

## बतावणी

प्रत्येकजण उघडी करतो आपापल्या यातनांची दारं
कुणी काखेतलं काढून रांगायला लावतो
कुणी यातनेला नवरीसारखं सजवतो
कुणाच्या यातनेचं घायपात
अंतर्यामाला डसत रहातं
मलां घालताच आला नाही
यातनेच्या बेफाम घोड्याला लगाम
त्याला चालवता आलं नाही
दुडक्या चालीनं
चर्चमधल्या एकांतिक मेणबत्तीसारखा
स्वतःतल्या स्वतःत जळत राहिलो मी
माझ्या माथ्यावर कोरलेलं सुभाषित
हसत होतं इस्पितळातल्या येडचासारखं
ईश्वर माझा मेंढपाळ आहे
ईश्वर माझा मेंढपाळ आहे
मी एक कोकरू
तू एक कोकरू
माझ्या अस्तित्वाच्या खुरटचा झुडपावर
चढून अनाहताची बकरी पाला खाते आहे
देव आणि देवाची भानगड
गेली गाढवाच्या गांडीत
मला आवडतं महापाप करायला
मला आवडतं माणसासारखं वागायला

प्रस्थापितांनी मयसभा
उभी केली माझ्यासाठी
पाण्याला पाणी म्हणू की जमीन ?
माझ्या आयपंढरीला सनातन वसवळीचा शाप

कशी नांगरून काढू
महानगरांवरली लूत
नागरी त्वचेची झूल
झुलीवरली भूल
मी नाकारलंय नंदीच्या अंडाला
हात लावून आत प्रवेश करणं
माझ्या ज्ञानदेवाची भिंत
जमिनीतच रुतून राहिली
माझ्या अस्पृश्य अंगणात
काहीच फुलू शकलं नाही
ना मोगरा फुल्ला
ना जाईजुई
नुसतंच होत ऱ्हायलं लोकसत्ताक दु:खाचं प्रक्षेपण
अन्हा-टपक्याचं उठवळ स्वातंत्र्य
माझ्या भुकेला नाही पारावार
माझ्या डोळ्यांची निद्रा गेली आहे चोरीला
यातनांचं सोंगीभजन
मला गाता येत नाही एकतारीवर
एकुलतं एक माझं बोट
तेच गळून पडलं चंद्रभागेच्या तीरी
कुणीतरी आणून द्यावं बोट माझं
कालातीताच्या अभंगाला छेडणारं
तू ऐक नंदाच्या नारीग s s हा व्हा s s
युमनेच्या तीरी ग s s हाहा s s
धुणं बाई धूत व्हत्या गवळ्याच्या नारीग .....
गवळ्याच्या पोरीग ......
दिवस आहे तोकडा
कशाला जागवू फुटक्या विहिरीतला
माती आसरा

## डॉ. आंबेडकर १९८६

उत्तरवाऱ्याशी माझी नदी हितगुज करते आहे
मी गातो आहे तुझं गाणं
प्रेमाला नसावेत डोळे
प्रेषितांच्याही प्रेषितांनी घ्यावी तुझ्या पायाशी लोळण
किती निर्व्याज तुझ्या-माझ्यातला ऋणानुबंध

शतकानुशतकांच्या पाषाणनिद्रेतून तू उठवलंस
आम्हाला
घडवून आणलंस पुनरुत्थान
आता आमच्या इच्छेच्या शेतात सर्व कांही उगवतं
स्टेनगन नी गुलाबाची फुलं
तूच म्हणाला होतास एकदिवस याचा स्फोट होईल
शांतता पायावर उभी राहून मोकळी होईल
सावलीवरला आळ धुतला जाईल
दिवसाचं वस्त्रहरण होणार नाही
तू दिलीस आम्हाला रोजची भाकरी
आणि आतुर विवस्त्र चंद्र

परस्पर हेतूंचा रेखीव हात
दयेचं एक रूप अस्तो समुद्र
आता माझ्या रात्रीच्या भिंतीला उंदीर कुरतडत नाहीत

स्वत:ला मारण्याचे सर्वच प्रयत्न फसले माझे
हिर्व्याजर्द टेबलांवरलं आयुष्य
गवतानचं खाऊन टाकलं काळ्या गाईला
सातघडीचं माझं निरंतर आकाश
त्यात झुलणारं नक्षत्राचं झुंबर
किती अद्भुत चमत्कार
कुणाची माय व्यालीय
या आरश्यातल्या आमच्या प्रतिमा
पुसून टाकण्याची
आमचे प्रियतर ऋतू परतून आलेयत पुन्हा वस्तीला
अन्नपाणी नी कपडालत्ता आम्हासाठी नाही दुर्मिळ
आणि ते दोन मांड्यामधलं अद्भुताचं संगीत
कस्तुरीची गांठ पडलेय उघडी
प्रत्येकजण शोधतोय आपापली मादी
आमच्या हृदयाभोवतालचं पोलादी अस्तर तू
टाकलंस फेडून
आता आम्ही नाही आहोत ब्राँझचे ओतीव पुतळे

कधीकाळी अंतरंगात साचला होता नरक
फिरवलीस यक्षिणीची कांडी
भरून टाकलंस हृदयाचं भांडं अमृतानं
त्याचक्षणी आमच्या शरीरातली जनावरं
पटापटा गेली मरून
आम्ही झालोत जीतीजागती माण्सं
आमच मेलेलं रक्त बहरून आलं पुन्हा
तल्वारीच्या तीक्ष्ण पात्याहून ते जालिम झालं
खरंच एवढं बळ तू कुठून दिलंस आम्हाला
चेहऱ्यावरले सर्व मुखवटे उतरवून मला जागवू दे
तुझ्या-माझ्यातले उत्तरदायीत्व

इतका अडाणी नाहीहे मी
की प्रत्येक प्रश्नाची उत्तरं तुझ्याकडे मागू
अखेरचं तृष्णाघर उद्ध्वस्त करून मी येतो आहे
तुला सामोरा
मी जाणतो झाला आहे माझ्या युगाचा उष:काल
आता उभारली जाईल मृण्मयी नगरी
जिच्यात नसेल सक्तमजुरीचा काळोख
जिच्यात नसेल दैनंदिन वेदनांचं महाभयंकर चिघळणं
विच्छन्नतेच्या आभाळानंतर
तुटल्या तटातट मुसक्या
आणि शेवटी माझ्या लोकांचं स्वातंत्र्य ठरलं अबाधित

आता इथे कुणीच नाही अभागी
प्रत्येकाचे दिवस असतात लखलखीत घोडयांसारखे
प्रत्येकाला येत अस्तो जळत्या केसांचा वास
क्रोधाच्या चकाकत्या मिठानंतर
रुजलं इथल्या नापिक जमिनीत विद्रोहाचं स्वप्न
आता आमच्या दारात शुभ्र हत्ती झुलतात
आता तंग भाषेची फांदी अशीच हलत रहाणार
नूतन इतिहासाची घडाघड होत रहाणार
कधी निद्रेत कधी जागृतीत
आनंदाच्या वादळाशी खेळते माझी नौका
महासागरसुद्धा मला माझ्याहून लहान वाटतो
मी बंड पुकारून
येतो आहे पुढे पुढे
मी दाखवीत नाही माझा चेहरा अधिक नवीन करून
पाण्याची एकेक भिंत जाते आहे तुटून
मला होऊदे तुझ्या सर्व लेकरांपेक्षा अधिक सुंदर
आता मरणाला साक्षी आश्वताचं पान
मी देहाच्या पायघड्या पसरवून
पहातो आहे तुझ्या आज्ञेची वाट
आता ही
ज्वालामुखीची वेल आणखी कुठे लावू ?

## विभ्रम

झाडानंच आपली जागा सोडली
ते चालत आलं अनवाणी पायांनी माझ्याकडं

मी द्वेष करायला शिकू काय त्याचा
की त्यावर बरसात करू निर्व्याज प्रेमाची
घोडे पिसाळतात
वखवखून येतात आतडी
अंगाप्रत्यंगातून खेळतात विजा
रक्ताला फुटतात जिभा
अस्त्याचं नस्तं
नस्त्याचं अस्तं होत जातं
कुठल्या दांभिक रूपाला साकडं घालू

अपंगपणाचा दशावतार
दुःखाच्या विभिन्न मुद्रा
आभाळाला भिडायची मातीची असोशी
सरळ स्वाभाविक होऊन जातो तेजोभंग
एकटेपणाच्या पाण्यात टाकला जातो दगड
आपलंच प्रतिबिंब अस्सं बिघडून येतं वरती



किती जपायचं साळुंकी जीवाला
स्वप्नाचं नी वास्तवाचं
विभ्रमाचं नी अशाश्वताचं दहिवर
काळाच्या कराल दाढेत पिसले जातो आपण

सर्व माणसंच अशी मातीची होतात
सर्व श्रद्धाच अशा कथलाच्या होतात
आपलीच आपल्याला वाटू लागते भीती
कुठल्या रंग-रूप-गंधासाठी मांडलं गेलंय हे जागरण
चंद्राची भाकर भुकेलेल्याला कशी रिझवेल
प्रज्वलित झालेली वेदना कोण कसा विझवेल
मला थयथयाट करू दे तुझ्या अंगणात
आत्मछळातून उद्‌भवलेय करुणा
तशात तू सांगतेयस
फुलपाखरांच्या पंखावरले रंग वेचायला
मी काय करू या विफलतेचं सवंग ?

# तुरुंग

बोधिसत्त्वाचं झाडं झुलत रहातं
वाऱ्याच्या लहरीबरोबर
नव्या वर्षाचं दहिवर अस्सं सांडत राहतं मनस्वी
अष्टांगिकाचं तेजस्वी पान
षड्‌विकारांना चिरत जातं
मनात दडलेला विदुषक
खोड्या करतो पापपण्याच्या
गुन्हा कोण करतं आणि सजा कुणाला
दिवेच टाकतात रस्त्यांचं चैतन्य पिऊन

आत मनाच्या आत
एक विधवा
आपल्या मुलाची कबर उकरत बसते
दुःखालयात चुपचाप वेदनेची मेणबत्ती जळते
या नीरव शांत चेहऱ्याला
तुम्ही ओळखता काय ?
या शृंखलांच्या झंकाराला तुम्ही
हृदयात साठवता काय ?
बेकसूर आयुष्यांचे चित्कार तुम्ही
ऐकता काय ?

जडशीळ उच्छ्‌वास
आणि हे आर्ततेचे टोल
घटनेचे साक्षीदारच जातात मरून
शहर होतं आकाशाला फितूर
एक अखंड भूमी चिरत जातो नांगर
आपण मुकं बहिरं व्हायचं
ठार–मुकं-बहिरं

## नवी दिल्ली १९८५

सुईचं टोक शोधतं रक्तधमनी
कवितेचे शत्रू असे जमून येतात तुझ्या शहरात

सत्तेचा शाप तुझ्या गावाला
या रक्ताच्या प्रवाहातून
गुलाबाची फुलं अशी वाहत जातात
तुझ्या यमुनेच्या पाण्याचं पितळच पडतं उघडं

इंडिया गेट
पलिकडे राष्ट्रपती भवन
किती कठोरपणं हे शहर विंचरून काढलंय
भूतकाळाच्या दरवाज्यावर झुलतायत पांढरे हत्ती
सोनार घडवताहेत हुबेहूब मोरांचे सांगाडे
सुतार मारतायत तुझ्या वैभवाला रंधा
दीर्घ काश्मिरी जाजम अंथरलं जातंय रस्त्यांतनं
शस्त्रसज्ज लष्कराच्या तुकड्या
सांस्कृतिकपणाची दिखावू खाज
नाचते आहे पाहुण्याराउळच्यांसमोर
घोड्यांच्या पलटणी
विमानवेधी तोफा
दहशतीचं अण्वस्त्र
राष्ट्रपती घेताहेत त्रिशंकूची सलामी
कुसळाच्या मुसळाशी पंतप्रधान
करताहेत हस्तांदोलन
वाहव्वा
किती किती छान गोयंदा खेळला जातोय

KISS ME & LOVE.

चाबुक सहन करणारा एक उत्तम घोडा
मृत्यू हाकारीत नेतो कुरणाकडे
मला वश करता आलं नाही त्याला

तडकलेल्या आयन्यात आसरा शोधणाऱ्या सावल्या
भंग पावतं स्थितप्रज्ञ समाधी
वाऱ्याचं शीड पडतं मोडून
प्रेम जाऊ लागतं उतू
वाजते एका हातानं टाळी
जरीना, फुलांची वस्त्रं कुणी चोरून नेलीयत

थेंब थेंबाला जातो आहे कापत
समुद्राच्या डोळ्यातला अंधार
चमकू लागला आहे काजळासारखा
ज़रीना, या सृष्ट/दृष्ट गोष्टींवर
उजाडायला सूर्याला मुभा दे

मला मन नाही नी शरीर
तुला मन नाही नी शरीर
तू एक पारदर्शक तुकडा
मी एक पारदर्शक तुकडा
पाण्याच्या मनात उजवलीय प्रतिमा
सत्य संभोगासारखं होऊन आलंय स्वाभाविक
पानांफुलांचं दर्शनशास्त्र फैलावतंय अफवेसारखं
ज़रीना, या बागेवर सांडू दे उजेड
भर उन्हात बरसणारा कारुण्याचा पाऊस
किती भयंकर अस्तित्वाचा रोग
वर्षानुवर्षं मी घासत बसलोय मनाचा आरसा
या हाडांच्या नगरकिल्ल्यातली चेतना विझवून टाक
हे हँग-ओव्हरचं हिलस्टेशन तोडून टाक

झोपलेल्या गावाला नेलं आहे महापुरानं वाहून
पलीकडचा तीर गाठायचाय मला
कधी कधी संपेल अनंतवासाचं सरोवर
थांबव थांबव ही सायकल
उजेडानंतर अंधार
अंधारानंतर उजेड
घुबडानं असा खडा झेलायला नको होता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९५०
क्र. १६।११।८७
ग्रंथ शाखा

हे जीवजंतू होऊ दे निर्वन
तुटू दे एकदाचे भवपाश
बुडू दे नाव पाण्यात
बरं झालं माझ्याही तृष्णेचं घर मोडू लागलं
वासे आढं
चिवट माती
राकट दगड
दगडामातीचं घर
जरीना या रीतेपणावर पडू दे उजेड

REFBK-0025267
REFBK-0025267

तुझी सैल मोकळी स्तनाग्रं
भेदभावाच्या हवाली करू नकोस मला
घनदाट अरण्याला न ओळखणारे पक्षी
न पाहता येणारा प्रकाशाचा झोत
या भयाच्या दरीत लोटू नको मला
स्वतःच्याच आतली कालातीत हालचाल
फुलांच्या सुगंधापेक्षा छान असतो चारित्र्याचा वास
पण मी काय करू?
भल्या सकाळीच मला पापी लोकांचे चेहरे पहावे लागतात
जरीना, माझ्याही चेहऱ्याला काळं फास
हे आसक्तीचं महायुद्ध थोडंच थांबणार आहे?
kiss me and love
जरीना
kiss me and love